MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION, MUMBAI
9, Hajarimal Somani Marg, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Terminus,
(CSMT) Mumbai – 400 001
Tel : 022-22092857
E-mail: court1-mshrc@mah.gov.in

## AMB/Suo Moto Case No.– 3858/13/16/2025 /2012

| | |
|---|---|
| Name of Respondent | :1 The Municipal Commissioner<br>Kalyan Dombivili Municipal Corporation<br>Thane |
| | 2 The Commissioner of Police<br>Thane |
| Date | : 15th September 2025 |
| Coram | : **Justice A. M. Badar, Chairperson** |

## PROCEEDING

1. Shri. Sachin Tamkhede, Asst. Commissioner is present. Advocate Rohan Gaikwad for Kalyan Dombivili Municipal Corporation is present.

2. The learned Advocate for the Municipal Corporation filed the affidavit in reply and seeks time to argue the matter.

3. **Matter to appear on board before Court No.1 on 27th November 2025 at 11.00 a.m.**

4. Inform to all the parties concerned.

**(Justice A. M. Badar)**
**Chairperson**

(1)

INWARD...5960/CRI/2025
RECEIVED DT. 13/06/2025
CLERK...
REGISTRAR...

महाराष्ट्र टाईम्स
बुधवार, २७ मे २०२५

# इमारतीचा स्लॅब कोसळून सहा मृत्युमुखी

म. टा. वृत्तसेवा, कल्याण

कल्याण पूर्वेतील तिसगाव नाका परिसरातील श्री सप्तशृंगी या चार मजली इमारतीचा स्लॅब कोसळून मंगळवारी झालेल्या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. मृतांमध्ये दोन वर्षांच्या बालिकेचा समावेश आहे.

सप्तशृंगी इमारतीला जागोजागी तडे गेले असतानाही प्रशासनाने ही इमारत धोकादायक घोषित केलेली नव्हती. जवळपास ३५ वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीत ५० कुटुंबे राहत होती. इमारतीच्या चौथ्या मजल्यावर सोमवारपासून लादीचे काम सुरू करण्यात आले होते. यादरम्यान इमारतीला आणखी तडे गेल्याने इमारतीचा एका बाजूचा स्लॅब कोसळला. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागासह आपत्ती दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यास सुरुवात केली.

## कल्याण पूर्वेतील दुर्घटना; सहा जण जखमी



या दुर्घटनेत प्रमिला साहू (५८), मनस्वी शेलार (२ वर्षे), सुनीता साहू (३७), सुजाता पाडी (३२), सुशीला गुजर (७८), व्यंकट चव्हाण (४२) यांचा मृत्यू झाला. श्रद्धा साहू (१४), अरुणा गिरनारायन (४८), श्रावील शेलार

(पान २वर)

## इमारतीचा स्लॅब कोसळून सहा मृत्युमुखी

(पान एकवरून)

(४ वर्षे), विनायक पाडी (४.५ वर्षे), यश क्षीरसागर (१३) आणि निखिल खरात (२६) असे सहा जण जखमी असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही इमारत ३५ वर्षे जुनी असली तरी धोकादायक घोषित करण्यात आलेली नव्हती. दुर्घटनेनंतर ही इमारत तातडीने रिकामी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. दुर्घटनास्थळी मदतकार्य संध्याकाळी ६.३० वाजता पूर्ण झाल्याचे पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले. दरम्यान, या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी जितेंद्र गुप्ता याला ताब्यात घेतले आहे.

### रस्ता नसल्याने बचावकार्यात अडथळे

सप्तशृंगी इमारतीचा स्लॅब कोसळल्याचे कळताच पालिकेचे मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, या इमारतीकडे जाणारा रस्ता अतिशय अरुंद असल्याने त्यातून दुचाकीही नेणे शक्य नव्हते. यामुळे या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या रहिवाशांना बाहेर काढताना कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागली. ढिगाऱ्यात सापडलेल्या चादरी, साड्यांमध्ये गुंडाळून मृतदेह कर्मचाऱ्यांनी गल्लीबोळातून रस्त्यावर उभ्या रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यात येत होते.

3858/13/16/2025

महाराष्ट्र टाईम्स
बुधवार, २१ मे २०२५

INWARD 5960/CRI/2025
RECEIVED DT. 13/06/2025
CLERK ...
REGISTRAR ... 13/06/25

# इमारतीचा स्लॅब कोसळून सहा मृत्युमुखी

म. टा. वृत्तसेवा, कल्याण

कल्याण पूर्वेतील तिसगाव नाका परिसरातील श्री सप्तशृंगी या चार मजली इमारतीचा स्लॅब कोसळून मंगळवारी झालेल्या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. मृतांमध्ये दोन वर्षांच्या बालिकेचा समावेश आहे.

सप्तशृंगी इमारतीला जागोजागी तडे गेले असतानाही प्रशासनाने ही इमारत धोकादायक घोषित केलेली नव्हती. जवळपास ३५ वर्षे जुन्या असलेल्या या इमारतीत ५० कुटुंबे राहत होती. इमारतीच्या चौथ्या मजल्यावर सोमवारपासून लादीचे काम सुरू करण्यात आले होते. यादरम्यान इमारतीला आणखी तडे गेल्याने इमारतीचा एका बाजूचा स्लॅब कोसळला. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागासह आपत्ती दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर

**कल्याण पूर्वेतील दुर्घटना; सहा जण जखमी**



काढण्यास सुरुवात केली.

या दुर्घटनेत प्रमिला साहू (५८), मनस्वी शेलार (२ वर्षे), सुनीता साहू (३७), सुजाता पाडी (३२), सुशीला गुजर (७८), व्यंकट चव्हाण (४२) यांचा मृत्यू झाला. श्रद्धा साहू (१४), अरुणा गिरनारायन (४८), श्रावील शेलार (पान २वर)

## इमारतीचा स्लॅब कोसळून सहा मृत्युमुखी

(पान एकवरून)

(४ वर्षे), विनायक पाडी (४.५ वर्षे), यश क्षीरसागर (१३) आणि निखिल खरात (२६) असे सहा जण जखमी असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही इमारत ३५ वर्षे जुनी असली तरी धोकादायक घोषित करण्यात आलेली नव्हती. दुर्घटनेनंतर ही इमारत तातडीने रिकामी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. दुर्घटनास्थळी मदतकार्य संध्याकाळी ६.३० वाजता पूर्ण झाल्याचे पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले. दरम्यान, या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी जितेंद्र गुप्ता याला ताब्यात घेतले आहे.

### रस्ता नसल्याने बचावकार्यात अडथळे

सप्तशृंगी इमारतीचा स्लॅब कोसळल्याचे कळताच पालिकेचे मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र, या इमारतीकडे जाणारा रस्ता अतिशय अरुंद असल्याने त्यातून दुचाकीही नेणे शक्य नव्हते. यामुळे या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या रहिवाशांना बाहेर काढताना कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागली. ढिगाऱ्यात सापडलेल्या चादरी, साड्यांमध्ये गुंडाळून मृतदेह कर्मचाऱ्यांनी गल्लीबोळातून रस्त्यावर उभ्या रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यात येत होते.

3858/13/16/2025